# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०२/२०२५ (गुरूवार) संध्याकाळ**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतां विरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन बोरी** :—दिनांक १३/०२/२०२५ रोजी बोरी पोलीस पोस्टे हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी उमरेड बुटीबोरी रोडवर देवळीगुजर येथे नाकाबंदी केली असता वाहन टिप्पर क्रमांक **एम एच ४० बीएफ ९८८९** थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती भरून दिसली.चालकास त्याने नाव, पत्ता विचारले असता त्याने **अनिकेत देवेंद्र श्रीरामे, वय २० वर्षे, रा इरवा ,ता. चिमूर जि चंद्रपूर** असे सांगितले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता टिप्पर मध्ये त्याच्या जवळील परवान्यापेक्षा जास्त रेती वाहुन नेत असल्याचे निदर्शनास आले. त्याला वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक आरोपी **नागेश सुरेश बावनकर वय ४० वर्षे रा कावरापेठ चौक, उमरेड** यांच्या सांगण्यावरून रेतीची अवैध वाहतुक करीत असल्याबाबत सांगितले. पंचासमक्ष **चालक आरोपीच्या ताब्यातुन** टिप्पर क्रमांक **एम एच ४० बीएफ ९८८९ किमती ४०,००,०००/— रूपये व त्यामध्ये १० ब्रास रेती, किमती ६०,००० /—रूपये असा एकुण ४०,६०,००० /— रूपयाचा चा मुददेमाल जप्त करण्यत आला.**

**चालक अनिकेत देवेंद्र श्रीरामे, वय २० वर्षे, रा इरवा, ता. चिमूर, जि चंद्रपूर** व वाहन मालक **नागेश सुरेश बावनकर ,वय ४० वर्षे ,रा कावरापेठ चौक, उमरेड**,जि नागपुर यांच्या विरूध्द कलम ३०३(२),४९,३(५), भा.न्या.स सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४,२१ खन आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. सहकलम मोवाका कलम ३(१)/१८१,५/१८०, कलम १३०/१७७ अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आले आहे.**




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर